महाराष्ट्र शासन
# शासकीय तंत्रनिकेतन, नाशिक
(महाराष्ट्र शासनाची शैक्षणिक दृष्टया स्वायत्त संस्था)
चेहडी (बु.), सामनगांव रोड, नाशिक रोड, नाशिक – ४२२१०१, दुरध्वनी क्र. ०२५३-२४६१२२१
Email:- office.gpnashik@dtemaharashtra.gov.in Web:- gpnashik.ac.in

जा. क्र. शातंनिना/परिक्षा विभाग /२०२०/308 दिनांक :- 19 JUN 2020

## महत्वाचे परिपत्रक

**विषय:- कोविड-19 च्या प्रादुर्भावामुळे व त्याअनुषंगाने लागु असलेल्या टाळेबंदीमुळे संस्थेची उन्हाळी परीक्षा 2020 व शैक्षणिक वेळापत्रकाबाबत...**

संदर्भ:- 1) म.रा.तं.शि.मंडळाचे परिपत्रक क्र. 83 दिनांक-15 मे 2020.
2) म.रा.तं.शि.मंडळाचे परिपत्रक क्र. 84 दिनांक-15 मे 2020.
3) संस्थेचे का.आदेश क्र. 756 दिनांक- 27 मे 2020.
4) म.रा.तं.शि.मंडळाचे परिपत्रक क्र. 2327 दिनांक-18 जून 2020.

महाराष्ट्र राज्य तंशिक्षण मंडळाने संदर्भ क्र. 1 मधील परिपत्रकान्वये उन्हाळी परीक्षा 2020 बाबतचे नियोजन व सुचना जाहीर केल्या तसेच संदर्भ क्र. 2 च्या परिपत्रकान्वये महाराष्ट्र राज्य तंशिक्षण मंडळाने परीक्षेसंबंधी दिलेल्या सुचनांचे पालन स्वायत्त तंत्रनिकेतनांनी करावे असे निर्देशित केले. संदर्भ क्र. 3 मधील दिनांक 27 मे 2020 च्या कार्यालयीन आदेशान्वये उन्हाळी परीक्षा 2020 संबंधी सूचना व वेळापत्रक जाहीर करण्यात आले होते. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने दिलेल्या निर्देशानुसार सदर कार्यालयीन आदेश व त्या अनुषंगाने कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. दरम्यान महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने संदर्भ क्र. 4 दिनांक 18 जून 2020 च्या परिपत्रकान्वये कोरोना मुळे उद्भवलेली स्थिती व लॉकडाऊन ची अवस्था बघता, जाहीर केलेले वेळापत्रक स्थगित केले आहे. त्यानुसार कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भ क्र.3 मध्ये नमूद कार्यालयीन आदेशातील शैक्षणिक वेळापत्रक व त्या अनुषंगाने असलेली कार्यवाही पुढील आदेशापर्यंत स्थगित करण्यात येत आहे. मात्र अंतिम सत्र वगळता द्वितीय व चतुर्थ सत्रात नियमित प्रवेश घेतलेल्या व परीक्षा अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर करण्यासंबंधीची कार्यवाही या आधी दिलेल्या सूचनांप्रमाणे सुरू राहील याची नोंद घ्यावी.

**(प्रा.ज्ञानदेव पुंडलिक नाठे)**
**प्राचार्य,**
**शासकीय तंत्रनिकेतन, नाशिक**

प्रत:- सर्व विभागप्रमुख व समन्वयक यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.